## मालेगांव पंचायत समिती, मालेगांव, जिल्हा नाशिक, या संस्थेचा सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल

जा.क्र.स्था/३/ब/लेप/पं.स मालेगांव/नाशिक/

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक
लेखा कोष भवन, तिसरा मजला,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
नाशिक.
दिनांक-

प्रेषक,
उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक

मालेगांव पंचायत समिती, मालेगांव, जिल्हा नाशिक या संस्थेचे सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षण श्री. सु. ध. ठाकरे, प्रभारी लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक १६.७.२००८ ते १४.८.२००८ या कालावधीत पुर्ण केले. त्यावर पुनर्विलोकन व अंतिमीकरण श्री. विजय ए. कोते, उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक १६.९.२००८ रोजी केले.

लेखा परिक्षीत आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे पदाधिकारी व अधिकारी संस्थेचे कामकाज पहात होते.

**सभापती :-**

| | |
|---|---|
| श्रीमती. उषाताई सुनिल देवरे | १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

**गटविकास अधिकारी :-**

| | |
|---|---|
| श्रीमती. नलिनी अप्रे | १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

## भाग पहिला
## (मागील लेखा परीक्षण )

मागील लेखा परीक्षण अहवालातील खालील परिच्छेद थकीत असून त्याबाबत मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे स्वतंत्ररित्या पत्रव्यवहार सुरु आहे.

| अ. क्र. | वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकुण परि. |
|---|---|---|---|
| १ | १९६९-७० | ३(४,५,६,७,८) | १ |
| २ | १९७५-७६ | ८ (ब),९ | २ |
| ३ | १९८०-८१ | ६ (२) | १ |
| ४ | १९९२-९३ | ७ | १ |
| ५ | १९९३-९४ | १३ | १ |
| ६ | २००० – २००१ | ३,१०,२०,२३(अ)<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.३: विदयुतपंप व हातपंप वर्गणी थकबाकी (४.१८४(८)<br>परि.क्र.१०:निवासस्थान भाडे थकबाकी (४.१८७)(१)<br>परि.क्र.२०: थकलेल्या आगाऊ रक्कमा (४.१८५(१५)<br>परि.क्र.२३(अ)(ब)- अपूर्ण स्थितीतील बांधकामे (ल.पा) (४.१८२(२१) | ४ |
| ७ | २००१-२००२ | ३,४,७,१४,१६<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.३ - ५० टक्के अनुदानावर गटार स्प्रेपंप शेतक-यांना वाटपाबाबत (४.१२२) (४४)<br>परि.क्र.१४ -पशुवैद्यकिय दवाखान्यांना औषध पुरवठा करणेबाबत (४.२४७)(६)<br>परि.क्र.१६- अपूर्ण बांधकामाबाबत. (४.२४७(६) (५५) | ५ |
| ८ | २००२-२००३ | ३,७,११,२४,२५<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.७:- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर पुर्वपरवानगी न घेता केलेबाबत.(४.१७३)<br>परि.क्र.२५:- अपुर्ण बांधकामांबाबत.(४.२०१(१६) | ५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | २००३-२००४ | ५,७,८(१,२,६),९(१,२),१२,१६<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.७: ५० टक्के अनुदानावर शेतक-यांसाठी प्लॅस्टिक क्रेटसचे वाटप. (४.८६)(४०२)<br>परि.क्र. १२:- अपूर्ण जवाहर विहीरीबाबत (ल.पा.) (४.१९८)(११)<br>परि.क्र.१६:- निवासस्थान भाडे नोंदवही वसुलीबाबत. (४.२०३)(१) | ६ |
| १० | २००४-२००५ | ३,४,५,६,७,११,१४<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.४:- १००% अनुदानाने २०% मधून गटार स्प्रेपंप वाटपाबाबत. (४.१९०)<br>परि.क्र.१४ :- अपूर्ण जवाहर विहीरीबाबत (ल.पा.)(४.३३२)(२१) | ७ |
| ११ | २००५-२००६ | ३,४,५,६,१२,१४,१६,१७,१८<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.१४:- प्रलंबित अग्रिम रक्कमेबाबत (४.७२८(२७))<br>परि.क्र.१६:- अपूर्ण जवाहर विहीरीबाबत (ल.पा.विभाग)(४.७३१(८) | ९ |
| १२ | **लेखा परीक्षण अहवाल सन २००६ — २००७** | | ९ |
| परिच्छेद क्रमांक ३ :- अंदाजपत्रकांबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक ४ :- पंचायत समिती वाढीव उपकरातून केलेले रस्ते दुरुस्ती कामाबाबत. (पंरास प्रस्तावित) | | | |
| परिच्छेद क्रमांक ५ :- १०% वाढीव उपकरातून अंगणवाडी केंद्रासाठी लोखंडी कपाट खरेदीबाबत. (पंरास प्रस्तावित) | | | |
| परिच्छेद क्रमांक ६ :- उपकराच्या २०% मागासवर्गीय निधीतून लोखंडी नांगर खरेदी करणे. (पंरास प्रस्तावित) | | | |
| परिच्छेद क्रमांक ७ :- रिकामे गोणी बारदान विक्रीच्या अनामत रक्कमेबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक ८ :- पंचायत समिती सभापती यांनी विहीत मर्यादेपेक्षा वाहनाचा अधिक वापर केल्याबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक ९ :- शौचालय भांडे खरेदीबाबत. (पंरास प्रस्तावित) | | | |
| परिच्छेद क्रमांक १० :- जवाहर रोजगार योजना विहीर अनियमितता. (पंरास प्रस्तावित) | | | |
| परिच्छेद क्रमांक ११ :- कार्यक्षेत्राबाहेर वाहनाचा वापर करणेबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक १२ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर केल्याबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक १३ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर केल्याबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक १४ :- थकीत अग्रिम रकमांबाबत. (पंरास प्रस्तावित) | | | |
| परिच्छेद क्रमांक १५ :- झुणका भाकर केंद्रासाठी दिलेल्या जागेबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक १६ :- हातपंप व विद्युतपंप वर्गणी थकबाकींबाबत. | | | |

| | |
|---|---|
| परिच्छेद क्रमांक १७ :- | निवासस्थानांच्या गैरवापराबाबत.... (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक १८ :- | कंत्राटी कामाच्या कामगारांचा विमा शासकीय विमा निधीकडे न उतरविणेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १९ :- | व्यवसायकर कमी कपात करणेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २० :- | खाजगी बोअर अधिग्रहण करणे. |
| परिच्छेद क्रमांक २१ :- | रोजगार हमी योजना अंतर्गत अपूर्ण कामांबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २२ :- | दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत ग्रामपंचयतींना केलेल्या अनुदान वाटपाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २३ :- | ग्रामसेवक ग्रामविस्तार अधिकारी व विस्तार अधिकारी यांच्या मासिक दैनंदिन्या विहीत मुदतीत प्राप्त नसतांना त्यांचे वेतन व भत्ते प्रदान करण्याच्या अनियमिततेबाबत |
| परिच्छेद क्रमांक २४ :- | अपूर्ण बांधकामाबाबत (कृषि विभाग) (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक २५ :- | ठेव रक्कमा व्यपगत न केलेबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक २६ :- | आकस्मिक खर्चाचे नोंदवहीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २७ :- | भांडे खरेदीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २८ :- | मैल कामगारांच्या आस्थापनेवरील खर्चाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २९ :- | निवृत्ती वेतन प्रदान नोंदवही व संवितरणातील नोंदी अद्ययावत ठेवणेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३० :- | मुदतबाह्य धनादेश रद्द न केलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३१ :- | नमुना नंबर ३९,४० व ४१ बाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३२ :- | तालुका मास्तर यांनी धनादेश रेखांकित न देणेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३३ :- | राष्ट्रीय बायोगॅस योजना नादुरुस्त संयंत्राबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३४ :- | ग्रामपंचायतीकडील अपहार प्रकरणांच्या निपटा-याबाबत.(पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक ३५ :- | जाती प्रमाणपत्राची पडताळणी करुन वैधता प्रमाणपत्र मुदतीत सादर न करणेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३६ :- | जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले न घेतलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३७ :- | प्रतिभूती बंधपत्रे घेतलेली नाहीत. |

टिप :- उपरोक्त नमुद केलेल्या आक्षेपांचे संदर्भात त्या-त्या वर्षाच्या पुढील अभिप्रायामध्ये नमुद केलेले आक्षेप क्रमांकच अंतिम समजणेत यावेत.

# भाग दुसरा
# चालु लेखा परीक्षण

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९(अ) खालील अनियमितता..

---

**परिच्छेद क्रमांक ३ :- अंदाजपत्रकाबाबत.**

पंचायत समिती, मालेगांवचे सन २००७ – २००८ चे मूळ अंदाजपत्रक पंचायत समिती ठराव क्रमांक ४२९ दिनांक ३.२.२००७ अन्वये व सुधारीत अंदाजपत्रक ठराव क्रमांक ५२२ दिनांक ४.२.२००८ अन्वये मंजूर केलेले आहे. प्रत्येक शिर्षकाखाली केलेल्या सुधारीत तरतुदींचा व खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | | | | आकडे रुपयांत |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | शिर्षक | सुधारीत तरतुद | प्रत्यक्ष खर्च | कमी खर्च | जास्त खर्च |
| १ | ३ शिक्षण | २,००,००० | ० | २,००,००० | -- |
| २ | ४ बांधकाम | ३,००,००० | ० | ३,००,००० | -- |
| ३ | ८-सार्व.आरोग्य | २०,००० | १९,९०९ | ९१ | -- |
| ४ | १४- समाजकल्याण | २,४०,००० | २,४०,००० | ० | -- |
| ५ | २० महिला व बालकल्याण | १,२०,००० | १,१९,२३६ | ७६४ | -- |
| ६ | २० संकिर्ण पंचायत समिती वाहनखर्च | १,२०,००० | १,१९,८१९ | १८१ | -- |
| ७ | ११ कृषी | १,४४,००० | ० | १,४४,००० | -- |
| ८ | १२-पशुसंवर्धन | ५६,००० | ० | ५६,००० | -- |
| | **एकुण:-** | १२,००,००० | **४,९८,९६४** | **७,०१,०३६** | -- |

सन २००७ – २००८ चे अंदाजपत्रक वाजवी नियोजन पूर्वक व वस्तुस्थितीस धरुन केले नसल्याचे दिसून आले.

| | |
|---|---|
| सन २००६-२००७ ची सुरुवातीची शिल्लक | रुपये २,१९,४७४.३१ |
| + प्राप्त अनुदान | रुपये ४,४८,४०३.०० |
| एकूण जमा | **रुपये ६,६७,८७७.३१** |

| | |
|---|---|
| खर्च अनुदान | रुपये ४,९८,९६४.०० |
| शिल्लक अनुदान | **रुपये १,६८,९१३.३१** |

या संदर्भात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) सुधारीत अदांजपत्रकामध्ये ३ शिक्षण या लेखाशिर्षासाठी रुपये २,००,०००/-, बांधकाम या शिर्षकाखाली रुपये ३,००,०००/-, सार्वजनिक आरोग्य स्थापत्य रुपये ५६,०००/- व कृषि विभाग लेखाशिर्षाखाली रक्कम रुपये १,४४,०००/- तरतूद करण्यात आली आहे. तथापि या शिर्षकाखाली काहीही खर्च करण्यात आला नाही. याबाबत पंचायत समिती सभेचे क्षमापन घेऊन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखवावे.

२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पं.रा.स/१०९३/प्र.क्र.१४४३/२० दिनांक २०.९.१९९३ नुसार उपलब्ध निधीचा पुरेपुर विनियोग होईल याची अंदाजपत्रक तयार करतांना काळजी घ्यावी, या सूचना दिल्या आहेत. शक्य योजनांसाठी तरतुदी केली असती अथवा संबंधित अधिका-यांनी नियोजनपूर्वक कामे केली असती तर बचत झाली नसती. नियोजन व काटेकोर अंमलबजावणी करणे ही बाब संबंधित अधिका-यांच्या अकार्यक्षमतेकडे निर्देश करते. याबाबत उचित कार्यवाही करुन, सर्वकष अहवाल पंचायत समिती सभागृहासमोर ठेऊन त्यावरील क्षमापन दिल्याबाबतच्या ठरावासह अनुपालन दर्शवावे.

---

## परिच्छेद क्रमांक ४ :- पंचायत समिती सेस अंतर्गत ९०% अनुदानावर सौर कंदील पुरविणेबाबत.

पंचायत समिती मालेगांव ने सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षात पंचायत समिती सेस अंतर्गत ९० % अनुदानावर सौर कंदील पुरविणेसाठी खालीलप्रमाणे खर्च केला आहे.

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम रु. | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | ३ | ३१.३.२००८ | २,४०,००० | "सनटेक" सोलर सिस्टीम, नाशिक यांचेकडून दरकरारानुसार ७४ नग रुपये ३,५४६/- दराने खरेदी केलेली आहेत. |
| | | **एकूण** | २,४०,००० | |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) पंचायत समिती ठराव क्रमांक ५२२ दिनांक ४.२.२००८ अन्वये योजनेची निवड करण्यांत आलेली आहे. मात्र त्यामध्ये लाभार्थी यादी नमुद नाही. त्यामुळे लाभार्थी निवड

कशाचे आधारे केली याची पडताळणी करता आलेली नाही. याबाबत स्पष्टीकरणासह लाभार्थी यादीस पंचायत समिती सभेची कार्योत्तर मान्यता घेऊन लेखापरीक्षणास अनुपालन दर्शवावे.

२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. झेडपीए – २०००/प्र.क्र.४१/३३ दिनांक १७.१.२००१ नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यात आलेली नाही.

३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ मधील नियम ८३(३) नुसार; पुरवठादाराकडून साहित्य प्राप्त झाल्यानंतर मालाची पडताळणी करुन मागणीनुसार व सुस्थितीत साहित्य प्राप्त झाल्याबाबतचे प्रमाणपत्र गटविकास अधिकारी यांनी दिलेले नाही. त्यामुळे योग्य दर्जाचे साहित्य प्राप्त झाल्याची खात्री लेखापरीक्षणास करता आलेली नाही.

४) देयकाची रक्कम रुपये २,४०,०००/- प्रदान केल्याचे रोखवहीत नमुद करण्यात आलेले आहे मात्र पोहच पावती रुपये २,६२,४०४/- ची घेण्यांत आलेली आहे. तफावतीबाबत साधार स्पष्टीकरण करावे.

५) मास्टर नोंदवहीत यापूर्वीच्या नोंदी घेण्यांत आलेल्या नसल्याने एकाच लाभार्थ्यांस दुबार लाभ देण्यांत आला किंवा कसे, याची खात्री करता आलेली नाही.

६) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांचे आदेश क्रमांक सकना/सक-४/१७९/०८ दिनांक २९.२.२००८ मधील अटी व शर्ती नुसार १०% लाभार्थी हिस्सा ३१ मार्च २००८ अखेर पावेतो जमा करण्यांत आलेला नाही. तरी १०% लाभार्थी हिस्सा रक्कम रुपये २६,२७०/- जमा केल्याबाबतची लेखापरीक्षणाची खात्री पटवावी.

७) लाभार्थ्यांचे विनियोग दाखले लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. तरी विनियोग दाखले उपलब्ध करुन लेखापरीक्षणास दाखवावे.

८) सदरचे सौर कंदील शासनाचे दर करारानुसार खरेदी करण्यांत आलेले आहेत. सदरच्या दरकरारातील अटी व शर्तीनुसार पुढील ५ वर्षांसाठी देखभालीस पुरवठादार बांधिल रहावा यासाठी त्यांचेकडून करारनामा घेणे बंधनकारक असतांना असा करारनामा घेण्यांत आलेला नाही. त्यामुळे नादुरुस्त झाल्यास खर्च निष्फळ होण्याची शक्यता आहे.

उपरोक्त आक्षेपांची पुर्तता होईपावेतो रक्कम रुपये २,४०,०००/- लेखापरीक्षणास आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
पंचायत समिती सेस
आक्षेपाधिन रक्कम रुपये २,४०,०००/-

---

**परिच्छेद क्रमांक ५ :- पंचायत समिती सेस अंतर्गत वाहनावरील दुरुस्ती खर्चाबाबत.**

पंचायत समिती मालेगाव ने सन २००७ – २००८ मध्ये पंचायत समिती सेस या लेखाशिर्षाखाली वाहन क्रमांक एम.एच. – १५ अेअे – ५०२६ साठी दुरुस्तीवर खालीलप्रमाणे खर्च केला आहे.

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम रू. | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | १ | २४.५.२००७ | ९९० | दुरुस्तीवरील खर्च |
| २ | १ | ५.७.२००७ | ६,८९० | दुरुस्तीवरील खर्च |
| ३ | १ | २१.८.२००७ | १,१३० | दुरुस्तीवरील खर्च |
| ४ | १ | १८.१०.२००७ | २,५३६ | दुरुस्तीवरील खर्च |
| ५ | २ | २८.११.२००७ | १,०९० | दुरुस्तीवरील खर्च |
| ६ | २ | २७.२.२००८ | ८७६ | दुरुस्तीवरील खर्च |
| ७ | ३ | २७.२.२००८ | ८,४२४ | दुरस्ती व बॅटरी खरेदी |
| ८ | १ | १५.३.२००८ | ८,०६२ | दुरस्ती व बॅटरी खरेदी |
| | | **एकूण** | **२९,९९८** | |

वरील खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ९५(१) नुसार वाहन दुरुस्तीची गरज असेल तर वाहन चालकाने खाते प्रमुख / गटविकास अधिकारी यांचेकडे लेखी अहवाल सादर करणे आवश्यक असून अहवालात मागील दुरुस्तीची तारीख व खर्च नमुद करणे आवश्यक आहे. तथापि अशाप्रकारे अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे गाडी दुरुस्तीची आवश्यकता होती काय? याची पडताळणी करता आलेली नाही.

२) तांत्रिक अधिका-याच्या सल्ल्यानुसार दुरुस्तीवरील खर्च करण्याचे आदेश असतांना तांत्रिक अधिका-यांची मंजूरी घेण्यांत आलेली नाही.

३) रुपये ५००/- च्या वरील दुरुस्तीच्या खर्चासाठी दरपत्रके मागविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली नाही. याबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन अनुपालन दर्शवावे.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पुर्तता होईपावेतो रक्कम रुपये २९,९९८/- आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे. आक्षेपांची पुर्तता न झाल्यास रक्कम रुपये २९,९९८/- वसूल करुन अनुपालन दर्शवावे.

लेखाशिर्ष
पंचायत समिती सेस
आक्षेपाधिन रक्कम रुपये २९,९९८/-

## <u>मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३०</u>
## <u>चे कलम ९ ( ब ) खालील अनियमितता.</u>

<u>(कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे किंवा गैरवर्तणुकीमुळे झालेले नुकसान.)</u>

---

### <u>परिच्छेद क्रमांक ६ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर केल्याबाबत.</u>

पंचायत समिती, मालेगाव यांचे कडील वाहन क्रमांक एम एच १५- एए ५०७५ ची वाहन रोजनिशी (लॉगबुक) तपासली केली असता या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट क्रमांक “ १ ” मध्ये नमुद केल्याप्रमाणे वाहनाचा विनापरवानगी कार्यक्षेत्राबाहेर ६१२६ किमी. प्रवास केला आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) शासन परिपत्रक क्रमांक जे.ई.पी.१०९३/सीआर/९१४/२६/दिनांक २.८.१९९३ नुसार जिल्हा परिषदेची स्वत:च्या उत्पन्नातील अथवा शासनाने खरेदी करुन दिलेली वाहने कार्यक्षेत्राबाहेर वापरणे अनुज्ञेय नाही.

तथापि शासन निर्णय ग्रामविकास विभाग जे.ई.पी.१०८९/सीआर/३५९०/२६ दिनांक ८ ऑगस्ट, १९८९ नुसार कार्यालयीन कामकाजासाठी काही अपरीहार्य कारणास्तव जिल्हा परिषदेची वाहने कार्यक्षेत्राबाहेर वापरणे आवश्यक असल्यास वरील शासन निर्णयानुसार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची विभाग प्रमुख या नात्याने पूर्व परवानगी घेतल्याशिवाय वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करु नये, असे स्पष्ट आदेश आहेत.

परंतु तालुका स्तरावरील अधिकारी पूर्व परवानगी न घेताच कार्यक्षेत्राबाहेर वाहनाचा वापर करतात, व शासनाचे इंधन खर्चावर मोठ्या प्रमाणात खर्च वाढतो. दरवर्षी कायक्षेत्राबाहेर वाहन वापरण्यासंदर्भात आक्षेप नोंदविण्यात येतो, व सदर आक्षेपाचे अनुपालन करतांना मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची कार्योत्तर मंजूरी घेतली जाते. त्यामुळे दरवर्षी आक्षेप नोंदवूनही कार्यक्षेत्राबाहेर वाहन वापरण्याबाबत पुनरावृत्ती होतच राहते. तथापि सदर बाबींस पायबंद होणेच्या दृष्टीने जिल्हा परिषदेचे विभाग प्रमुख यांनी वरील शासन निर्णयानुसार काही काही महत्त्वपूर्ण काम असल्याची खात्री करुनच कार्योत्तर मंजूरी द्यावी. अन्यथा वसुलीचे आदेश द्यावेत.

२) शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र.जेईपी/२४६९/१७७०३/डी-१/दि.१४.११.१९६९ अन्वये वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच शासन निर्णय ग्रा.वि.वि.क्र. जेईपी/१०/सीआर/५९/००/०५ दिनांक २४.४.२००० अन्वये पूर्वपरवानगी शिवाय त्यांचे वापरातील वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरल्यास कार्योत्तर मंजूरी अनुज्ञेय नाही.

शासन निर्णय, ग्रामविकास विभाग, क्रमांक जेईपी २४६९/११७०३/जी-२ दिनांक २१.११.१९६९ अन्वये वरील वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करण्यापूर्वी सक्षम अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. तथापि पूर्वपरवानगी न घेताच केलेला प्रवास हा खाजगी प्रवास समजून वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक प्रवास १००५/ प्र.क्र.३३/सेवा-५ दि. ८.७.२००५ अन्वये प्रति किलोमीटर रुपये ८/- प्रमाणे रक्कम रुपये ४९,००८/- संबंधितांकडुन वसुल करुन पुर्तता दर्शवावी.

वसुलपात्र रक्कम रुपये ४९,००८/-

---

**<u>परिच्छेद क्रमांक ७ :- कार्यक्षेत्राबाहेर वाहनाचा वापर करणेबाबत.</u>**

एकात्मिक बालविकास प्रकल्प, मालेगाव यांचेकडील वाहनक्रमांक एम एच – १५ के १७४८ वृत्तांत नोंदवहीची तपासणी केली असता खालील तपशिलानुसार वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर झालेला आहे.

| अ.क्र. | दिनांक | प्रवासाचे ठिकाण | एकूण कि.मी. |
|---|---|---|---|
| १ | १२.०४.२००७ | जि.प. नाशिक | २५६ |
| २ | १३.१२.२००७ | जि.प. नाशिक | २४३ |
| | | **एकूण** | **४९९** |

१) शासन परिपत्रक क्रमांक जे.ई.पी.१०९३/सीआर/९१४/२६/दिनांक २.८.१९९३ नुसार जिल्हा परिषदेची स्वत:च्या उत्पन्नातील अथवा शासनाने खरेदी करुन दिलेली वाहने कार्यक्षेत्राबाहेर वापरणे अनुज्ञेय नाही.

तथापि शासन निर्णय ग्रामविकास विभाग जे.ई.पी.१०८९/सीआर/३५९०/२६ दिनांक ८ ऑगस्ट, १९८९ नुसार कार्यालयीन कामकाजासाठी काही अपरीहार्य कारणास्तव जिल्हा परिषदेची वाहने कार्यक्षेत्राबाहेर वापरणे आवश्यक असल्यास वरील शासन निर्णयानुसार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची विभाग प्रमुख या नात्याने पूर्व परवानगी घेतल्याशिवाय वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करु नये, असे स्पष्ट आदेश आहेत.

परंतु तालुका स्तरावरील अधिकारी पूर्व परवानगी न घेताच कार्यक्षेत्राबाहेर वाहनाचा वापर करतात, व शासनाचे इंधन खर्चावर मोठ्या प्रमाणात खर्च वाढतो. दरवर्षी कायक्षेत्राबाहेर वाहन वापरण्यासंदर्भात आक्षेप नोंदविण्यात येतो, व सदर आक्षेपाचे अनुपालन करतांना मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची कार्योत्तर मंजूरी घेतली जाते. त्यामुळे दरवर्षी आक्षेप नोंदवूनही कार्यक्षेत्राबाहेर वाहन वापरण्याबाबत पुनरावृत्ती होतच राहते. तथापि सदर बाबींस पायबंद होणेच्या दृष्टीने जिल्हा परिषदेचे विभाग प्रमुख यांनी

वरील शासन निर्णयानुसार काही काही महत्त्वपूर्ण काम असल्याची खात्री करुनच कार्योत्तर मंजूरी द्यावी. अन्यथा वसुलीचे आदेश द्यावेत.

२) शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र.जेईपी/२४६९/१७७०३/डी-१/दि.१४.११.१९६९ अन्वये वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच शासन निर्णय ग्रा.वि.वि.क्र. जेईपी/१०/सीआर/५९/००/०५ दिनांक २४.४.२००० अन्वये पूर्वपरवानगी शिवाय त्यांचे वापरातील वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरल्यास कार्योत्तर मंजूरी अनुज्ञेय नाही.

३) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रवास १००५/प्र.क्र.३३/सेवा-५/दि. ८.७.२००५ अन्वये जिल्हापरिषदेचे अधिकारी यांनी पूर्वपरवानगीशिवाय वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर केल्यास त्याबाबत ज्या अधिकारी / कर्मचारी यांनी वाहनाचा वापर केला असेल त्यांचेकडून प्रति किलोमिटर रुपये ८/- प्रमाणे रक्कम वसुल करण्यात यावी.

महिला व बालकल्याण विभागाकडील सक्षम अधिकारी यांनी पूर्व परवानगी शिवाय कार्यक्षेत्राबाहेर वापर केलेल्या एकूण ४९९ किमी. प्रवास खाजगी प्रवास समजून रुपये ३,९९२/- एवढी रक्कम संबंधितांकडून वसुल करुन पुर्तता दर्शवावी.

वसुलपात्र रक्कम रुपये ३,९९२/-<br>पंचायत समिती<br>महिला व बालकल्याण विभाग, मालेगाव

---

**<u>परिच्छेद क्रमांक ८ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर केल्याबाबत.</u>**

पंचायत समिती, मालेगाव यांचे कडील वाहन क्रमांक एम एच १५ - एए ५०२६ हे वाहन पंचायत समितीने त्यांचे वाढीव उपकरातून खरेदी केलेले असून खर्च देखील वाढीव उपकरातून करण्यात येतो. या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट क्रमांक “ २ ” मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदरच्या वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर सन २००६-२००७ या वित्तीय वर्षातील वाहन रोजनिशीची तपासणी केली असता विनापरवानगी कार्यक्षेत्राबाहेर ४४६८ किलोमिटर प्रवास केला आहे.

शासन निर्णय, ग्रामविकास विभाग, क्रमांक जेईपी २४६९/११७०३/जी-२ दिनांक २१.१.१९६९ अन्वये वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करण्यापूर्वी सक्षम अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. तथापि पूर्वपरवानगी न घेताच केलेला प्रवास हा खाजगी प्रवास समजून वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक प्रवास १००५/ प्र.क्र.३३/सेवा-५ दि. ८.७.२००५ अन्वये प्रति किलोमीटर रुपये ८/- प्रमाणे रक्कम रुपये ३५,७४४/- संबंधितांकडुन वसुल करुन पंचायत समिती उपकर खाती जमा करावी.

वसुलपात्र रक्कम रुपये ३५,७४४/-<br>वाढीव उपकर मालेगाव

---

# मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( क ) खालील अनियमितता.

---

## परिच्छेद क्रमांक ९ :- थकीत अग्रिम रकमांबाबत.

या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या विवरणपत्र क्रमांक " ३ अ " नुसार दिनांक ३१.३.२००८ अखेर एकूण रक्कम रुपये ३,८७,४५६/- कार्यालयातील कर्मचारी, प्राथमिक शिक्षक यांचेकडे सण, धान्य, प्रवास भत्ता, वेतन इत्यादी प्रकारच्या अग्रिमांच्या स्वरुपात रक्कम थकीत व येणे आहेत.

शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक लेपुअ/१०९२/ प्र.क्र.१४६९/३० दिनांक २६.२.१९९३ अन्वये दिलेल्या सुचनेनूसार गटविकास अधिकारी यांनी ठोस कार्यवाही करुन थकीत अग्रिमाची संपूर्ण रक्कम रुपये ३,८७,४५६/- वसूल करणेची कार्यवाही करावी देण्यात आलेल्या अग्रीम रक्कमांची वसुली / समायोजन वेळीच होणे आवश्यक आहे. अग्रीम रक्कमांची वसुली वेळीच न झाल्यास जबाबदार असणारे अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करुन अनुपालन दाखवावे.

---

## परिच्छेद क्रमांक १० :- झुणका भाकर केंद्रासाठी दिलेल्या जागेबाबत.

पंचायत समिती, मालेगांव कार्यालयाचे आवारात चेअरमन मातोश्री झुणका भाकर केंद्र, मालेगांव यांना जिल्हा परिषद नाशिक जा.क्र.जिपना/बांध/इ व द/२/डिम/ २६८/दिनांक १०.११.१९९८ अन्वये झुणका भाकर केंद्र चालविण्यासाठी ११.८४५ चौ.मी. (३.७० मीटर X ३.२० मीटर) जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संस्था विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक झुयायो/३९९९/प्र.क्र.१३७६/ना.प्र./२२ दिनांक २७.६.२००० अन्वये झुणका भाकर योजना बंद झाल्याने केंद्र चालकांना नोटीसा बजाविणे व केंद्राची जागा परत घेणे अशी कार्यवाही होणे अपेक्षित असतांना पंचायत समिती / जिल्हा परीषदेने याबाबत ठोस कार्यवाही करुन जागा ताब्यात घेतलेली नाही. ही केंद्रे बंद करणेबाबत मा. सर्वोच्च न्यायालयानेही अलीकडेच राज्य शासनास अनुमती दिली आहे.

उपअभियंता (इ व द) मालेगाव यांचे पत्र क्रमांक ४७९ दिनांक २७.७.२००६ नुसार सदर जागेचे भाडे दरमहा रुपये ९०/- निधीत केले आहे. दिनांक ३१.७.२००८ अखेर भाड्यापोटी एकूण रक्कम रुपये ६,९२९/- एवढी येणे आहे.

त्यांपैकी संबंधितांनी रुपये ३,८९०/- चा भरणा पंचायत समितीकडे केलेला आहे. उर्वरित रक्कम रुपये ३,०३९/- येणे बाकी आहे. यासंदर्भात मागील सन २००६ – २००७ चे लेखापरीक्षण अहवालात आक्षेप क्रमांक १५ नोंदवूनही संबंधितांनी कोणतीही पुर्तता केली नाही. सदरच्या जागाभाडे निश्चितीबाबत उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मालेगाव यांचेकडून आदेश प्राप्त करणे आवश्यक असतांना त्यांच्याकडे भाडे निश्चितीबाबत प्रस्ताव सादर करण्यांत आलेला नाही. ही बाब गंभीर अनियमित आहे. तरी आता सदरची रक्कम संबंधितांकडून वसूल करुन व जागा ताब्यात घेण्याबाबत योग्य ती कार्यवाही करुन पुर्तता लेखापरिक्षणास दर्शवावी.

वसुलपात्र रक्कम रुपये ३,०३९/-

---

**<u>परिच्छेद क्रमांक ११ :- निवासस्थानांच्या गैरवापराबाबत....</u>**

पंचायत समिती आवारात एकुण १४ कर्मचारी निवासस्थाने आहेत. त्यांपैकी निवासस्थान क्रमांक ७ हे श्री. सि. एस. मोरे, सेवानिवृत्त कृषि अधिकारी यांचे ताब्यात दिनांक २०.१२.१९७९ पासून दिल्याबाबत निवासस्थान वाटप नोंदवहीत नोंद असून श्री. मोरे दिनांक १.१०.१९९३ पासून सेवानिवृत्तीनंतरही या निवासस्थानाचा वापर करीत आहे. जिल्हा परिषद, नाशिक बांधकाम विभाग पत्र क्र. जी.आर./५/८८/दिनांक ८.८.१९८८ नुसार रुपये १,०५८/- दरमहा भाडे संबंधितांकडून वसुल करणेबाबत प्रमाणित केले आहे.

श्री. मोरे यांचेकडे मागील लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक १७ नुसार रुपये २,२०,०६३/- एवढी थकबाकी होती व सन २००७ - २००८ या वित्तिय वर्षाची थकबाकी रुपये १२,६९६/- अशी एकूण थकबाकीची रक्कम रुपये २,३२,७५९/- एवढी आहे. या वसुलीबाबत पंचायत समितीने उपअभियंता (बांधकाम) यांचेकडून दर चार वर्षांनी फेरनिर्धारण व्हावयाचे आहे. श्री. मोरे यांचे सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून पूर्वलक्षी प्रभावाने ते करुन घ्यावे व व्यापारी दराने दंडनिय भाडे आकारणी करुन एकूण थकबाकीची रक्कम निर्धारीत करुन वसुल करुन निवासस्थान रिक्त करुन घ्यावे. तसेच मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे प्रस्तुत आक्षेपासह या प्रकरणी हलगर्जीपणा करणा-या वा श्री. मोरे यांना नियमबाह्य सहकार्य करणा-या कर्मचा-यांवर उचित प्रशासकीय कार्यवाही करणेबाबत अहवाल पाठवून, त्यावरील मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशांन्वये कारवाई पूर्ण करावी.

ब) निवास क्रमांक ८ हे नादुरुस्त असल्याचे सांगण्यात आले आहे. तथापि सदरचे निवासस्थान कशामुळे नादुरुस्त आहे, याबाबत माहिती प्राप्त झाली नाही. तांत्रिक विभागाकडून याबाबत पत्रव्यवहार करुन निवासस्थान क्रमांक ८ दुरुस्ती करुन उपयोगात आणण्याबाबत निर्णय व्हावा.

वसुलपात्र रक्कम रुपये २,३२,७५९/-

---

# मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ड) खालील अनियमितता.

---

## परिच्छेद क्रमांक १२ :- पंचायत समिती सेस अंतर्गत अंगणवाडी केंद्रासाठी लोखंडी कपाट खरेदीबाबत.

पंचायत समिती मालेगाव अंतर्गत प्रकल्पातील अंगणवाडी केंद्रासाठी दप्तर व साहित्य सुरक्षित ठेवण्यासाठी सन २००७ – २००८ मध्ये पंचायत समिती सेस अंतर्गत लोखंडी कपाटे खरेदी करण्यांत आलेली आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम रु. | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | ५ | ३१.३.२००८ | १,१९,२३६ | महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, नाशिक यांचेकडून ५२ लोखंडी कपाटे रुपये २,२९३/- या दराने खरेदी केलेली आहेत. |
| | | **एकूण** | १,१९,२३६ | |

या संदर्भात खालील अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) पुरवठादारांकडून साहित्य प्राप्त झाल्यानंतर लेखासंहिता नियम ८३(३) प्रमाणे मालाची पडताळणी करुन मागणीप्रमाणे व सुस्थितीत साहित्य प्राप्त झाल्याबाबतचा दाखला गटविकास अधिकारी यांनी दिलेला नाही. त्यामुळे योग्य दर्जाचे साहित्य प्राप्त झाल्याची खात्री लेखापरीक्षणास करता आलेली नाही.

२) अंगणवाड्यांची कपाटे मागणी बाबतचा प्रस्ताव लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

वरील आक्षेपांची पुर्तता होईपावेतो रक्कम रुपये १,१९,२३६/- लेखापरीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
पंचायत समिती सेस
आक्षेपाधिन रक्कम रुपये १,१९,२३६/-

---

**परिच्छेद क्रमांक १३ :- निवृत्ती वेतन प्रदान नोंदवही अपूर्ण असणेबाबत. (१९ पेन्शन)**

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ३९ परिशिष्ट ४ मधील नियमान्वये पंचायत समितीत येणा-या प्रत्येक मागणी बिलाची व नोंदवहीची गट विकास अधिकारी याने प्रदान आदेशावर सही करण्यापूर्वी कनिष्ठ लेखा अधिका-यांकडून तपासणी होणे आवश्यक आहे.

पंचायत समिती मालेगाव यांचे कार्यालयांतील निवृत्ती वेतन देयके, निवृत्ती वेतन लेखापरीक्षण नोंदवही (ए.पि.पि.९) आणि उपदान व अंशराशीकरण नोंदवही (नमुना ए.पी.पी. १०) यांची तपासणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे अपूर्णता व तृटी आढळून आलेल्या आहेत.

१. नमुना ए.पी.पी. ९ मधील लेखा परीक्षण नोंदवहीत निवृत्ती वेतनाचा प्रकार, निवृत्ती वेतन सुरु झाल्याचा दिनांक, अशंराशीकरण केलेली रक्कम व प्रदानाचा दिनांक, मुळ निवृत्ती वेतन, अशंराशीकरणानंतरची रक्कम, महागाई भत्त्याचे दर, मासिक एकत्रित निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाचे दर, निवृत्ती वेतनधारक मृत्यू पावल्यास मृत्यूची नोंद, वारसांची नोंद, प्रत्येक महिन्यांत किती निवृत्ती वेतन प्रदान केलेले याची नोंद व तपासणी केल्याबद्दल लेखाधिकारी यांची स्वाक्षरी, जिवीत प्रमाणपत्राची नोंद, पुनर्विवाहाची / पुनर्नियुक्तीची नोंद, वयांची ६५ वर्षे पूर्ण किंवा मृत्यूनंतर ७ वर्षे यांपैकी जे अगोदर घडले असेल इत्यादी संबंधीच्या तारखा, मृत्यूनंतरच्या जादा प्रदान केलेल्या रक्कमा बँकेकडून परत मागवून शासन सदरी भरणा केल्याबद्दलच्या चलनासह नोंदी, अशंराशीकरणानंतर १५ वर्षांनी पुनर्स्थापना केल्याबाबतच्या नोंदी, चौथ्या, पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारीत निवृत्ती वेतन आदेशाप्रमाणे सुधारीत निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाच्या नोंदी बँकेचे नाव व खाते क्रमांक इत्यादी नोंदी परिपूर्ण घेण्यांत आलेल्या नसल्यामुळे निवृत्ती वेतन धारकांस / कुटूंब निवृत्तीवेतनधारकांस योग्य प्रदान झाले किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणांत परिपूर्ण पडताळणी करता आलेली नाही.

२. बँकेमार्फत निवृत्तीवेतन घेणा-या निवृत्तीवेतनधारकास प्रत्येक वर्षी जीवीत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जीवीत प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास त्या निवृत्ती वेतन धारकास निवृत्ती वेतन प्रदान करण्याचे थांबवावे, असे नियम असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे तपासणी आढळून आलेले नाही.

३. नियम ८० अन्वये ज्या कुटूंब निवृत्तीवेतनधारकाचे निवृत्ती वेतन विवाहानंतर व पुनर्विवाहानंतर बंद होणार आहे. त्यांच्याकडून नमुना ए.पी.पी. १४ मध्ये दर सहामाहीस प्रतिज्ञापत्र मागविण्यांत येऊन ते डिसेंबर व जून मध्ये देय होणा-या निवृत्ती वेतन बिलासोबत जोडण्यांत यावे. असे प्रमाणपत्र देण्यात कसून झालेल्या प्रकरणांचे सविस्तर विवरण जानेवारी व जूलै महिन्यांत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचकडे सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

४. निवृत्ती वेतन आदेशांत निवृत्ती वेतन धारकांचे फोटो, स्वाक्षरीचे नमुने, सुधारीत निवृत्ती वेतनाचे आदेश इत्यादी प्रकारचे अत्यावश्यक कागदपत्रे नस्तीबध्द केलेली नाहीत.
५. निवृत्ती वेतन बिल, निवृत्ती वेतन प्रदान आदेश व निवृत्त वेतन लेखा परीक्षा नोंदवहीतील नोंदी यामध्ये संदर्भिय नोंदवही क्रमांक, पृष्ठ क्रमांक यांची नोंद घेण्यात आलेली नाही. त्यामुळे संदर्भांकित लेखे तपासणीस लेखा परीक्षणात बराच कालावधी व श्रम व्यर्थ खर्च करावे लागत आहेत.

सदरचे नमुना ए.पी.पी. ९ व इतर अभिलेखे वेळीच पूर्ण न केल्याने योग्य प्रदाने झाल्याची पडताळणी लेखापरीक्षणांस करता आली नाही. या महत्त्वाच्या नोंदवह्या अपूर्ण ठेवणे ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. याबाबत संबंधित कर्मचारी व अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करावी. तोपर्यंत निवृत्ती वेतन, उपदान, अशंराशीकरण यावरील रक्कम रुपये १,९४,४९,३५४/- लेखापरीक्षणांत तात्पुरती अमान्य करण्यांत येत आहे.

---

## परिच्छेद क्रमांक १४ :- निवृत्ती वेतन प्रदान नोंदवही अपूर्ण असणेबाबत. (३ शिक्षण पेन्शन)

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ३९ परिशिष्ट ४ मधील नियमान्वये पंचायत समितीत येणा-या प्रत्येक मागणी बिलाची व नोंदवहीची गट विकास अधिकारी याने प्रदान आदेशावर सही करण्यापूर्वी कनिष्ठ लेखा अधिका-यांकडून तपासणी होणे आवश्यक आहे.

पंचायत समिती मालेगाव यांचेकडील गटशिक्षण अधिकारी यांचे कार्यालयांतील निवृत्ती वेतन देयके, निवृत्ती वेतन लेखापरीक्षण नोंदवही (ए.पि.पि.९) आणि उपदान व अंशराशीकरण नोंदवही (नमुना ए.पी.पी. १०) यांची तपासणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे अपूर्णता व तृटी आढळून आलेल्या आहेत.
१. नमुना ए.पी.पी. ९ मधील लेखा परीक्षण नोंदवहीत निवृत्ती वेतनाचा प्रकार, निवृत्ती वेतन सुरु झाल्याचा दिनांक, अशंराशीकरण केलेली रक्कम व प्रदानाचा दिनांक, मुळ निवृत्ती वेतन, अशंराशीकरणानंतरची रक्कम, महागाई भत्त्याचे दर, मासिक एकत्रित निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाचे दर, निवृत्ती वेतनधारक मृत्यू पावल्यास मृत्यूची नोंद, वारसांची नोंद, प्रत्येक महिन्यांत किती निवृत्ती वेतन प्रदान केलेले याची नोंद व तपासणी केल्याबद्दल लेखाधिकारी यांची स्वाक्षरी, जिवीत प्रमाणपत्राची नोंद, पुनर्विवाहाची / पुनर्नियुक्तीची नोंद, वयांची ६५ वर्षे पूर्ण किंवा मृत्यूनंतर ७ वर्षे यांपैकी जे अगोदर घडले असेल इत्यादी संबंधीच्या तारखा, मृत्यूनंतरच्या जादा प्रदान केलेल्या रक्कमा बँकेकडून परत मागवून शासन सदरी भरणा केल्याबद्दलच्या चलनासह नोंदी, अशंराशीकरणानंतर १५ वर्षांनी पुनर्स्थापना केल्याबाबतच्या नोंदी, चौथ्या, पाचव्या वेतन

आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारीत निवृत्ती वेतन आदेशाप्रमाणे सुधारीत निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाच्या नोंदी बँकेचे नाव व खाते क्रमांक इत्यादी नोंदी परिपूर्ण घेण्यांत आलेल्या नसल्यामुळे निवृत्ती वेतन धारकांस / कुटूंब निवृत्तीवेतनधारकांस योग्य प्रदान झाले किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणांत परिपूर्ण पडताळणी करता आलेली नाही.

२. बँकेमार्फत निवृत्तीवेतन घेणा-या निवृत्तीवेतनधारकास प्रत्येक वर्षी जीवीत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जीवीत प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास त्या निवृत्ती वेतन धारकास निवृत्ती वेतन प्रदान करण्याचे थांबवावे, असे नियम असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे तपासणी आढळून आलेले नाही.

३. नियम ८० अन्वये ज्या कुटूंब निवृत्तीवेतनधारकाचे निवृत्ती वेतन विवाहानंतर व पुनर्विवाहानंतर बंद होणार आहे. त्यांच्याकडून नमुना ए.पी.पी. १४ मध्ये दर सहामाहीस प्रतिज्ञापत्र मागविण्यांत येऊन ते डिसेंबर व जून मध्ये देय होणा-या निवृत्ती वेतन बिलासोबत जोडण्यांत यावे. असे प्रमाणपत्र देण्यात कसूर झालेल्या प्रकरणांचे सविस्तर विवरण जानेवारी व जूलै महिन्यांत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचकडे सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

४. निवृत्ती वेतन आदेशांत निवृत्ती वेतन धारकांचे फोटो, स्वाक्षरीचे नमुने, सुधारीत निवृत्ती वेतनाचे आदेश इत्यादी प्रकारचे अत्यावश्यक कागदपत्रे नस्तीबध्द केलेली नाहीत.

५. निवृत्ती वेतन बिल, निवृत्ती वेतन प्रदान आदेश व निवृत्त वेतन लेखा परीक्षा नोंदवहीतील नोंदी यामध्ये संदर्भिय नोंदवही क्रमांक, पृष्ठ क्रमांक यांची नोंद घेण्यात आलेली नाही. त्यामुळे संदर्भांकित लेखे तपासणीस लेखा परीक्षणात बराच कालावधी व श्रम व्यर्थ खर्च करावे लागत आहेत.

सदरचे नमुना ए.पी.पी. ९ व इतर अभिलेखे वेळीच पूर्ण न केल्याने योग्य प्रदाने झाल्याची पडताळणी लेखापरीक्षणांस करता आली नाही. या महत्त्वाच्या नोंदवह्या अपूर्ण ठेवणे ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. याबाबत संबंधित कर्मचारी व अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्‍चित करावी. तोपर्यंत निवृत्ती वेतन, उपदान, अशंराशीकरण यावर एकूण खर्च रक्कम रुपये ८,८७,३१,००८/- लेखापरीक्षणांत तात्पुरती अमान्य करण्यांत येत आहे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक १५ :- मुदतबाह्य धनादेश रद्द न केलेबाबत.</u>**

पंचायत समिती, मालेगावचे खालील निधी अंतर्गत, दिनांक ३१.३.२००८ अखेर रोखीकरण न झालेल्या धनादेशांचा तपशिल नोंदलेला आहे. त्यात खालील दर्शविलेले धनादेश ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीचे आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता १९६८ चे नियम ३१ अन्वये मुदतबाह्य धनादेश रद्द करुन, संबंधित निधींचे लेख्यांत धनादेशांची रक्कम योग्य त्या लेखाशिर्षकाखाली जमा करुन अनुपालन दाखवावे.

| अ.क्र. | धनादेश क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| जिल्हा निधी | | | |
| १ | ४६१६ | ०९.०७.२००७ | ३००० |
| २ | ४६३० | १७.०७.२००७ | ४९० |
| ३ | ६१३२ | ०८.०८.२००७ | ३००० |
| जिल्हा परिषद सेस | | | |
| ४ | २२१८ | १०.०५.२००७ | २१० |
| ५ | २२२० | १०.०५.२००७ | २१० |
| ६ | २२२२ | १०.०५.२००७ | २१० |
| ७ | २४५२ | १२.०९.२००७ | ६०९२ |

---

**परिच्छेद क्रमांक १६ :- संबंधितांना लिहीलेले धनादेश प्रदान न केलेबाबत.**

अहवालासोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक “ ३ ” नुसार पंचायत समितीकडील जिल्हा निधी, अभिकरण योजना, जिल्हा परिषद सेसच्या सन २००७ – २००८ मधील रोखवही व धनादेश पुस्तक यांची पडताळणी केली असता लिहीलेले धनादेश संबंधितांना लेखापरीक्षण काळापर्यंत प्रदान करणेत आलेले नाहीत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम २७ अन्वये लागलीच आवश्यकता असलेशिवय खर्च करणेस अनुमती नाही, अशी तरतुद असतांना गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांनी केवळ त्या – त्या लेखाशिर्षाखालील अनुदान व्यपगत होऊ नये म्हणून आवश्यकता नसतांनाच दिर्घदिन खर्च नोंदविला आहे. याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे क्षमापन घेऊन पुर्तता दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक १७ :- जवाहर विहीरी अनुदानातील अनियमितता**

पंचायत समिती मालेगावचे सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणात जवाहर विहीरी योजनेअंतर्गत दिलेल्या अनुदानाचे लेखापरीक्षण केले असता त्यामध्ये खालीलप्रमाणे उणिवा आढळून आलेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | लाभ धारकाचे नाव | अनुदानाची रक्कम | उणिवा / आक्षेप |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती. सुभद्राबाई सोनसिंग राजपूत | ६०,००० | करारनामा घेण्यांत आलेला नाही |
| | | | ५०० फुटांचे आत दुसरी विहीर नसल्याबाबतचे महसूल विभागाचे प्रमाणपत्र घेण्यांत आलेले नाही |
| २ | श्री. हिरालाल अण्णा पाटील | ६०,००० | ७/१२ उता-यावर विहीरीचे काम पूर्ण केल्याबाबतची नोंद घेण्यात आलेली नाही. |
| | | | अंदाजपत्रकाप्रमाणे बांधकाम केलेले नाही |
| | **एकूण** | **१,२०,०००** | |

वरीलप्रमाणे आक्षेपांची पुर्तता दर्शवून अनुपालन सादर करावे तोपर्यंत रक्कम रुपये १,२०,०००/- शासकीय अनुदानासाठी तात्पुरती अमान्य करण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
जवाहर विहीरी अनुदान
तात्पुरती अमान्य रक्कम रुपये १,२०,०००/-

---

**<u>परिच्छेद क्रमांक १८ :- पूर्ण केलेल्या कामांची नोंदवही न ठेवणेबाबत.</u>**

जिल्हा परिषद व पंचायत समिती मधील बांधकाम उपविभागाने नमुना नंबर ६९ मध्ये पूर्ण केलेल्या कामांची नोंदवही ठेवावी. त्यामध्ये प्रत्येक कामाचे नाव, कामाचे ठिकाण, काम सुरु झाल्याची तारीख, काम पूर्ण झाल्याची तारीख, मक्तेदाराचे नाव, लेखाशिर्ष, कामावरील एकूण खर्च व स्थावर मालमत्ता नोंदवहीतील संदर्भिय नोंद इत्यादी तपशिल या नोंदवहीत नोंदविण्यात यावा. अशी नोंदवही परिरक्षित केल्याने संबंधित विभागामार्फत विविध योजनांतर्गत पूर्ण केलेल्या कामांची एकत्रित माहिती त्वरीत उपलब्ध होऊ शकते. मात्र पंचायत समिती, मालेगावच्या बांधकाम उपविभागाने अशी नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे पंचायत समिती मालेगावने आजपावेतो किती कामे पूर्ण केलेली आहेत व एखाद्या कामावर दुबार खर्च नोंदविण्यात आलेला आहे किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आलेली नाही. तरी नमुना नंबर ६९ परिरक्षीत करुन त्यामध्ये अद्ययावत नोंदी घेऊन लेखापरीक्षणास दाखविण्यात यावी.

---

**परिच्छेद क्रमांक १९ :- नमुना नंबर ३९,४० व ४१ बाबत.**

अ) उपविभाग बांधकाम (इ व द) यांनी त्यांचे दप्तरी ठेवलेल्या नमुना नंबर ३९,४० व ४१ ची तपासणी करता खालील त्रुटी प्रामुख्याने आढळून आल्या आहेत.

१) नमुना नंबर ३९ मधील रकाना क्रमांक ७,८ व ९ मध्ये काहीएक तपशील नमुद नाही. तसेच दरवर्षी ५% प्रमाणे सन २००६-२००७ ची घसारा रक्कम रकाना क्रमांक १२ मध्ये नमुद केलेली नाही. या सर्व नोंदी परिपूर्ण व्हाव्यात.

२) नमुना नंबर ४० मध्ये सन १९९४ पासूनच्या पुढील नविन रस्त्यांच्या नोंदी घेतलेल्या नाहीत. सर्व नोंदी परिपूर्ण घेऊन व तसे प्रमाणित करुन पूर्तता दर्शवावी.

३) नमुना नंबर ४१ मध्ये सन १९९३ पासूनच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

उपरोक्त नमुन्यातील सर्व रकाने व परिपूर्ण नोंदी घेऊन व तसे प्रमाणित करुन पुर्तता दर्शवावी.

ब) नमुना नंबर ३९ व ४१ लघुपाटबंधारे उपविभाग मालेगाव

लघुपाटबंधारे उपविभाग मालेगाव यांचेकडील नमुना नंबर ३९ व ४१ या नोंदवह्यांतील रकाना क्रमांक ७, ८ व ९ मध्ये काही एक तपशील नमुद नाही. तसेच सन २००५-२००६ व २००६-२००७ या वित्तीय वर्षातील पूर्ण कामांच्या नोंदी नोंदवहीत नमुद आहेत, परंतु शेरा या रकान्यात सक्षम उपअभियंता यांनी स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे प्रत्यक्ष कामाच्या पहाणीअंती नोंदी प्रमाणित का केल्या नाहीत, याबाबत स्पष्टीकरण द्यावे व नोंदवहीवरील नमुद त्रुटींची पूर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

याबाबत मागील सन २००६ – २००७ चे लेखापरीक्षण अहवालात क्रमांक ३१ अन्वये आक्षेप नोंदवूनही पूर्तता झाली नाही, ही बाब खेदजनक आहे.

---

**परिच्छेद क्रमांक २० :- अपूर्ण जवाहर विहीरीबाबत. (लघुपाटबंधारे)**

पंचायत समिती, मालेगाव अधिनस्त लघुपाटबंधारे उपविभागाकडील दिनांक ३१.३.२००८ अखेरपर्यंत मंजूर जवाहर विहीरीची सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक " ४ " मध्ये नमुद केल्याप्रमाणे कामे अपूर्ण असून त्यांवर रुपये ११,८३,२५७/- खर्च करण्यांत आलेला आहे.

१) सन १९९९ – २००० पासून २००४ – २००५ अखेर पावेतो मंजूर विहीरींची कामे अपूर्ण असून ही अतिशय गंभीर स्वरुपाची बाब आहे. या अपूर्ण कामांवर रक्कम रुपये ११,८३,२५७/- अनुदान खर्च होऊन सुध्दा योजनेचा लाभविषयक मुळ उद्देश सफल होत नाही.

लाभार्थ्यांकडून विहीत मुदतीत पूर्ण न झालेल्या कालावधीपासून अवर सचिव, नियोजन विभाग, मुंबई यांचे आदेश क्र. ६५ दिनांक १३.९.२००१ अन्वये १८% दराने व्याज आकारणी करुन दंड वसूल करण्यांत यावा.

२) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग आदेश क्र. नाशिक / जाविका-१२९८ /प्र.क्र.१०४ /रोहयो-१० दिनांक १.७.१९९८ मधिल परिच्छेद क्र. १७ व १८ नुसार विहीरीचे काम प्रशासकीय मान्यतेच्या आदेशातील दिनांकापासून दोन महिन्याचे आत सुरु करुन पुढील १२ महिन्यांचे आत काम पूर्ण करावयाचे असतांना, वरील प्रकरणी या शासन आदेशाचे पालन झालेले नाही.

पंचायत समिती, मालेगाव

---

**परिच्छेद क्रमांक २१ :- अपूर्ण १२ व्या वित्त आयोगाच्या कामाबाबत..**

मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे आदेश क्रमांक जिपना/अर्थ/बाविआ/१२७८/०७ दिनांक १८.८.२००७ अन्वये १२ वा वित्त आयोगाअंतर्गत सन २००७ – २००८ साठी रक्कम रुपये १९,३४,२३३/- अनुदान पंचायत समिती मालेगाव यांना देण्यांत आलेले आहे. सदरचे अनुदान दिनांक ३१.३.२००८ अखेरपर्यंत खर्च करणे क्रमप्राप्त होते. परंतु पंचायत समिती, मालेगावने दिनांक ३१.३.२००८ पर्यंत परिपूर्ण खर्च केलेला नाही. त्यामुळे शासनाचे विकासाबाबतचे उद्दिष्ट सफल झालेले नाही.

सोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक “ ५ ” नुसार १२ व्या वित्त आयोगामध्ये मार्च २००८ अखेर ३ कामे अपूर्ण असून त्यांवर एकूण रुपये २,१४,२५२/- इतका खर्च झोला आहे. तरी सदरची कामे त्वरीत पूर्ण करुन पुढील लेखापरीक्षणांच्या वेळी दाखविण्यांत यावे.

---

**परिच्छेद क्रमांक २२ :- प्रतिभूती बंधपत्रे घेतलेली नाहीत.**

पंचायत समिती मालेगावने सन २००७ – २००८ या लेखापरीक्षण कालावधीत खालील तपशिलात दर्शविलेल्या कर्मचा-यांचे प्रतिभूती बंधपत्रे प्राप्त केलेली नाहीत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखासंहिता १९६८ चे नियम ४३ अन्वये प्रतिभूती बंधपत्रे घेणे आवश्यक आहे. तरी खालील कर्मचा-यांची प्रतिभूती बंधपत्रे प्राप्त करुन अनुपालन दाखवावे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. एच. बी. चौधरी | शाखा अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा |
| २ | श्री. एस. पी. पाटील | शाखा अभियंता लघुपाटबंधारे उपविभाग |
| ३ | श्री. एस. जी. शिंदे | शाखा अभियंता लघुपाटबंधारे उपविभाग |
| ४ | श्री. डी. डी. चव्हाण | शाखा अभियंता लघुपाटबंधारे उपविभाग |
| ५ | श्री. वाय. एस. सोनवणे | अनुरेखक लघुपाटबंधारे उपविभाग |
| ६ | श्री. पी. एन. चव्हाण | शाखा अभियंता इ व द |
| ७ | श्री. व्ही. डी. कदम | शाखा अभियंता इ व द |

---

**परिच्छेद क्रमांक २३ :- जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले न घेतलेबाबत.**

पंचायत समिती मालेगाव सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणाचेवेळी खालील कर्मचा-यांचे जामीनदार हयात व लायक असलेबाबत दाखले दप्तरी नाहीत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचयत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम ४३ (२) अन्वये प्रत्येक वित्तीय वर्षाचे सुरुवातीस जामीनदार हयात व लायक दाखले घेणेत आलेले नाहीत. तरी उपरोक्त नियमांप्रमाणे कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणात दाखवावे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. डी. ए. देशमुख | कनिष्ठ सहाय्यक ग्रामीण पाणी पुरवठा |
| २ | श्री. एस. ए. भामरे | शाखा अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा |
| ३ | श्री. पी. वाय. देसाई | कनिष्ठ सहाय्यक लघुपाटबंधारे उपविभाग |
| ४ | श्री. डी. एस. निकम | वाहन चालक लघुपाटबंधारे उपविभाग |
| ५ | श्री. एस. एन. सूर्यवंशी | शाखा अभियंता इ व द |
| ६ | श्रीमती. एस.एस.पवार | सदा. बा. शि. प्र. अ |
| ७ | श्रीमती. बी. एम. जगताप | मुख्य सेविका बालविकास प्रकल्प |
| ८ | श्रीमती. एस. एम. थोरात | मुख्य सेविका |
| ९ | श्रीमती. एम. व्ही. पाठक | मुख्य सेविका |
| १० | श्रीमती. एस. आर. पवार | मुख्य सेविका |
| ११ | श्रीमती. पी. आर. गवळी | मुख्य सेविका |
| १२ | श्री. पी. एम. इंगळे | पशुधन पर्यवेक्षक |
| १३ | श्री. बी. डी. पवार | पशुधन पर्यवेक्षक |
| १४ | श्री. एच. जे. पावरा | पशुधन पर्यवेक्षक |

| | | |
|---|---|---|
| १५ | श्री. आर. एन. नोरे | पशुधन पर्यवेक्षक |
| १६ | श्री. ए. व्ही. सोनवणे | सहाय्यक लेखाधिकारी |
| १७ | श्री. एच. पी. धर्माधिकारी | कनिष्ठ सहाय्यक प्राथमिक आरोग्य केंद्र, वडनेर |
| १८ | श्री. डी. डी. बनकर | ग्रामसेवक |
| १९ | श्री. जे. एस. आसात | ग्रामसेवक |

---

**परिच्छेद क्रमांक २४ :- आक्षेप विवरणपत्र**

लेखा परीक्षणांत आढळून आलेल्या किरकोळ स्वरुपाच्या आक्षेपांची पुर्तता लेखा परीक्षण कालावधीत करुन घेतल्याने आक्षेप विवरणपत्र निर्गमीत करण्यात आलेले नाही.

---

**परिच्छेद क्रमांक २५ :- विवरणपत्र**

या अहवालासोबत आवश्यक ती नेहमीची विवरणपत्रे जोडण्यात आलेले आहे.

---

**परिच्छेद क्रमांक २६ :- लेख्यांची स्थिती.**

पंचायत समितीची लेख्यांची स्थिती सर्वसाधारण चांगली आहे. विशेषत: मालमत्ता विषयक लेख्यांच्या स्थितीमध्ये अधिक सुधारणा करण्यात यावी.

---

**परिच्छेद क्रमांक २७ :- वार्षिक लेखे.**

या लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांचे संपूर्ण पूर्ततेस अधिन राहून व निवडक महिन्यांशिवाय इतर महिन्यांतील जमा खर्चामध्ये कुठलीही गंभीर अनियमितता अंतर्गत लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेली नाही याआधारे पंचायत समितीचे सन २००७ – २००८ चे लेखे बरोबर आढळून आले आहेत, असे नमुद करण्यात येत आहे.

---

**परिच्छेद क्रमांक २८ :- अनुपालन व पोहोच.**

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम १०(१) प्रमाणे, प्रस्तुत लेखापरीक्षण अहवालांतील आक्षेपांचे अनुपालन, चार महिन्यांचे आत पंचायत समितीच्या ठरावाच्या प्रतिसह तीन प्रतीत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे स्वाक्षरीने पाठविण्यांत यावे, तसेच अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक कळवून पोहोच दयावी.

(वि. ए. कोते)
उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा,नाशिक.

**प्रत सविनय सादर**

१) मा. सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.( पत्राने )
२) मा. महालेखापाल, बाहय लेखा परीक्षण विभाग, मुंबई
३) मा. आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
४) मा.मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.
५) मा.उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ ), स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग, नाशिक .

**प्रत सस्नेह अग्रेषित :-**

१) म.उपमुख्य लेखा परीक्षक (पंचायत राज समिती ), स्थानिक निधी लेखा, मुंबई.
२) म.गटविकास अधिकारी, पंचायत समिती मालेगांव, जिल्हा-नाशिक.

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक